# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. १३ फेब्रुवारी २०१९**

# नागरिकांच्या जागरूकतेविना स्वच्छ, सुंदर शहराची संकल्पना अपूर्णच : महापौर नंदा जिचकार

## नेहरू नगर झोन : ‘महापौर आपल्या दारी’ उपक्रमांतर्गत नागरिकांशी संवाद

**नागपूर, ता. १३ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या ‘व्हिजन’मुळे आज आपले नागपूर शहर स्मार्ट सिटीमध्ये अव्वल आहे. मात्र शहर स्मार्ट होत असताना शहरातील एक जबाबदार नागरिक म्हणून आपणही आपल्या वागणुकीतून स्मार्ट होणे आवश्यक आहे. स्वच्छता, आरोग्य या सर्व बाबी नागरिकांच्याच हातात आहेत. स्वच्छ भारत अभियानांतर्गत संपूर्ण शहरात स्वच्छतेसंदर्भात कारवाई सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखून जागरूक होणे आवश्यक आहे. ‘महापौर आपल्या दारी’ उपक्रमाद्वारे लोकप्रतिनिधी व प्रशासनाशी नागरिकांचा थेट संपर्क येत आहे व ते आपल्या समस्या मांडू शकत आहेत. या उपक्रमाद्वारे नागरिक आपल्या समस्यांबाबत जागरूक झाले आहेत.

नागरिकांच्या जागरूकतेविना स्वच्छ, सुंदर शहराची संकल्पनाच अपूर्ण आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

'महापौर आपल्या दारी' उपक्रमांतर्गत मागील दोन महिन्यांपासून महापौर नंदा जिचकार यांनी दहाही झोनमध्ये दौरा करून नागरिकांशी त्यांच्या समस्यांबाबत संवाद साधला. त्याअंतर्गत नेहरू नगर झोनच्या प्रभाग २८ व ३० द्वारे बुधवारी (ता. १३) 'महापौर आपल्या दारी' उपक्रमाचा समारोप झाला. यावेळी नागरिकांशी संवाद साधताना महापौर नंदा जिचकार बोलत होत्या. याप्रसंगी नेहरू नगर झोन सभापती रिता मुळे, जलप्रदाय समिती सभापती विजय झलके, आरोग्य समिती सभापती मनोज चापले, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, नगरसेविका मंगला गवरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, सहायक आयुक्त हरीश राऊत यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

महापौर नंदा जिचकार यांनी नेहरू नगर झोनमधील प्रभाग २८ व ३० अंतर्गत कामगार नगर रमना मारोती, श्यामबाग, सेवादल नगर, सक्करदरा तलाव, भोसले नगर, आशीर्वाद नगर, तोहिद नगर, रिंग रोड परिसर आदी भागांची पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांनी नेहरू नगर झोनमधील विविध विभागांच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी कोणतिही पूर्वसूचना न देता गैरहजर आढळलेल्या आरोग्य विभागाच्या जमादार हजारे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

कामगार नगर रमना मारोती परिसरातील गडर लाईन खचल्याने येथील रहिवास्यांच्या घरच्या विहिरींना गढूळ पाणी येत असल्याची तक्रार यावेळी नागरिकांनी केली. सदर परिसरात नवीन गडर लाईन टाकण्यात आली असून या गडर लाईनला जोडणी करण्याचे आवाहन यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी केले. रमना मारोती वस्तीमध्ये उतार असल्याने परिसरातील वस्त्यांमधील पाणी येथे जमा होत असल्याचीही तक्रार यावेळी करण्यात आली. यासंबंधी कार्यवाही संदर्भात

संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेण्याचेही निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

श्यामबाग वस्तीमध्ये नव्याने तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या बाजूला अतिक्रमण, वस्तीपुढील भागात रस्त्याचे बांधकाम, रिकाम्या भूखंडावर कचराघर, झोपडपट्टीधारकांना पट्टे वाटप आदी मागण्या परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात आल्या. संपूर्ण शहरात असलेल्या अतिक्रमणाच्या समस्येसंदर्भात दहाही झोनमध्ये झोनस्तरीय अतिक्रमण पथक तयार करण्यात आले आहे. या पथकाद्वारे श्यामबाग झोपडपट्टी परिसरासह झोनमधील अतिक्रमण तातडीने हटविणे तसेच वस्तीपुढे रस्त्याच्या बांधकामाबाबत आवश्यक ती चौकशी करून कार्यवाही करणे, रिकाम्या भूखंडावरील कचराघरासंदर्भात भूखंडधारकाला नोटीस बजावण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. झोपडपट्टीधारकांना पट्टे वाटपासंदर्भात येत्या १८ फेब्रुवारीला नेहरू नगर झोनमध्ये आयोजित पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या ‘जनसंवाद’ कार्यक्रमात समस्या मांडण्याचे आवाहन यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी केले.

सेवादल नगर येथील झोपडपट्टीधारकांना एसआरए अंतर्गत घरे बांधून देण्यात आली मात्र अजूनही काही नागरिकांचे अतिक्रमण कायम असल्याने नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करण्यास त्रास होतो. या भागात झोनस्तरीय पथकाकडून अतिक्रमण हटविण्याचेही महापौर नंदा जिचकार यांनी निर्देशित केले. सक्करदरा तलावामध्ये नागरिकांकडून टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे तलावात घाण होत असल्याची तक्रार यावेळी करण्यात आली. यासंबंधी कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे फलक परिसरात लावणे व कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करणे तसेच रस्त्याच्या बाजूने तलावाला जाळी लावण्याचेही महापौर नंदा जिचकार यांनी निर्देशित केले.

भोसले नगर येथील सुर्वे लेआऊट परिसरात असलेल्या मंगल कार्यालयातील समारंभप्रसंगी रस्त्यावर पार्किंग केली जात असल्याने वाहतूक विस्कळीत होते. शिवाय रस्त्याच्या कडेला कचरा आणि सायंकाळी असामाजिक तत्वांच्या वावरामुळे

नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार परिसरातील महिलांनी केली. मंगल कार्यालयातील रस्त्यावर पार्किंगसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणे, असामाजिक तत्वांवर आळा घालण्यासाठी परिसरात नियमित पोलिस गस्त लावण्याबाबत पोलिस प्रशासनाला पत्र देणे व परिसरात कायम स्वच्छता राहावी यासाठी विशेष काळजी घेत कामचुकारपणा करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

आशीर्वाद नगर येथील बाजार परिसरात भाजी विक्रत्यांना व्यवसायासाठी नागपूर सुधार प्रन्यासकडून गाळे तयार करण्यात आले. मात्र त्यानंतरही अनेक वर्षांपासून रस्त्यावरच बाजार भरत असल्याची तक्रार यावेळी करण्यात आली. यासंदर्भात भाजी विक्रते, नासुप्र व संबंधित सर्वांच्या समन्वयाने बाजार गाळ्यांमध्ये स्थानांतरीत करण्याबाबत कार्यवाही करण्याचे महापौर नंदा जिचकार यांनी निर्देशित केले. तोहीद नगर येथील नाल्याच्या समस्येसंदर्भात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या ‘जनसंवाद’मध्ये प्रश्न मांडण्याचे आवाहन महापौरांनी केले. रिंग रोडवर भंगार कारखाना धारकांकडून करण्यात आलेल्या अतिक्रमणासंदर्भात तातडीने कारवाई करणे व परिसरातील लॉनमुळे रस्त्यावर होणाऱ्या पार्किंग संदर्भात लॉन मालकाला नोटीस बजावण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. शहरात सर्वत्र स्वच्छता राहावी यासाठी नियमीत पाहणी करून आवश्यक तिथे कारवाई करणे व अतिक्रमण हटविण्यासंदर्भात कठोर पवित्रा घेत शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याचेही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी निर्देशित केले.